# प्रेसनोट दिनांक १८/०३/२०२३

## व्यावसायीकास खंडणी मागणा-या सराईत गुन्हेगारास अटक
## खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात छोटे मोठे व्यावसायीक, कंपनी तसेच जनतेकडून कोणत्याही प्रकारे जबरदस्तीकरुन, त्यांचेकडून हप्त वसुली करुन, खंडणी गोळा करणाऱ्या इसमाबाबतची माहिती निर्भिडपणे देण्याकरीता पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात पोलीस स्टेशन व खंडणी विरोधी पथकामार्फत दर्शनीय भागावर फ्लेक्स लावुन, नागरीकांना निर्भीडपणे तक्रार द्यावी याबाबत जाहीर आवाहन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने दिनांक १७/३/२०२३ रोजी प्लॉटींग विक्री व्यावसायीकाने खंडणी विरोधी पथक कार्यालयात समक्ष हजर राहुन कळविले की, तक्रारदार यांचा तळवडे परिसरात प्लॉटींग विक्रीचा व्यवसाय करीत असुन, सुमारे १ वर्षापासुन इसम नामे सुधीर सोपान जाधव याने तक्रारदारास तु प्लॉटींग व्यवसायामध्ये भरपुर पैसा कमवला आहे. माझेवर मर्डरची केस असुन, पिंपरी चिंचवडचा भाई आहे. तुला जर प्लॉटींग धंदा करायचा असल्यास, दरमहीना १०,०००/-रुपये हप्ता दयावा लागेल. अशी धमकी देवुन, गुगल पे द्वारे ३८,०००/-रुपये रक्कम घेवुन, फिर्यादीचे ऑफीस मध्ये येऊन, टेबलचे ड्राव्हर मध्ये ठवेलेले ४०,०००/-रुपये रोख रक्कम जबरदस्तीने काढुन घेवुन, ''पोलीसांकडे तक्रार केल्यास, तुला खलास करुन टाकु'' अशी धमकी देवुन, एकुण ७८,०००/-रुपये रक्कम, हप्ता म्हणून खंडणी घेतली आहे. तसेच आणखीन २ लाख रुपये रक्कम खंडणी मागुन, पैसे न दिल्यास, तक्रारदार व तक्रारदाराचे मुलाचा मर्डर करुन टाकीन'' अशी जीवे मारण्याची धमकी दिली अशी तक्रार दिल्याने, त्याबाबत वपोनि अरविंद पवार यांनी तात्काळ दखल घेवुन, सदर प्रकार वरिष्ठांना कळविला असता, वरिष्ठांनी सदर बाबत दिलेल्या आदेश व सुचना प्रमाणे, व्यावसायीकाने दिलेली तक्रार घेवुन, त्याबाबत **देहुरोड पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर १९३/२०२३ भादवि कलम ३८६,३८७,३९२,४४८ अन्वये गुन्हा दाखल करुन,** त्या अनुषंगाने खंडणी विरोधी पथकाचे अंमलदाराना दिलेल्या आदेशाप्रमाणे, **आरोपी नामे** सुधीर सोपान जाधव वय ४२ वर्षे रा.मोई गाव, फलके वस्ती, साई लॉन्ड्री जवळ, चाकण, ता.खेड जि.पुणे **यास** दिनांक १७/०३/२०२३ रोजी २१:१० वा.कुरुळी-मोई रोडवर, मोई येथुन ताब्यात घेवुन, त्याचेकडे सदर गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस करता, त्याने गुन्हा केला असल्याची तोंडी कबुली दिली. नमुद आरोपीस देहुरोड पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. १९३/२०२३ भादवि कलम ३८६,३८७,३९२,४४८ हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यास पुढील कारवाईकामी देहुरोड पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास देहुरोड पोलीस स्टेशन हे करत आहे. **आरोपी सुधीर सोपान जाधव हा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, त्याचे विरुध्द खुन, बलात्कार व इतर असे एकुण ०५ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.**

**सदरची कारवाई मा.विनय कुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.मनोज लोहीया, सह पोलीस आयुक्त, मा.डॉ.संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा.स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.डॉ.प्रशांत अमृतकर, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार, सहा.पोलीस निरीक्षक उध्दव खाडे, सहा.पो.उप-निरी.अशोक दुधवणे, अमर राऊत, पोलीस अंमलदार रमेश गायकवाड, निशांत काळे, रमेश मावसकर, किरण काटकर, आशिष बोटके, शैलेश मगर, सुधीर डोळस, प्रदीप गायकवाड व प्रदीप गुट्टे यांचे पथकाने केली आहे.**

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**गुन्हे, पिंपरी चिंचवड**

Scanned with CamScanner